SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR KNOWLEDGE RESOURCE CENTER
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र
Phone (Direct) : +91-0231- 2609204, Office : 2609205, Deputy Librarian : 2609210,
Asst. Librarian : 2609421, 2609212 Stack : 2609212, Circulation : 2609210,
Periodical : 2609208, Archival : 2609336, Reference : 2609209
Website : URL : http://www.unishivaji.ac.in/library E-mail : subbkl@unishivaji.ac.in
Estd 1962
NAAC 'A' Grade

Ref. No. : SU/BBKKRC/
शि.वि./बॅ.बा.ख.ज्ञा.स्त्रो.कें./ ग्रंथमहोत्सव 2019/623

Date :
दिनांक : 6 FEB 2019

प्रति,
मा. प्रकाशक, विक्रेते इ.
-----------------------------------------
-----------------------------------------
-----------------------------------------

महोदया / महोदया,

आपणास माहितच आहे की,दिक्षांत समारभांचे औचित्य साधून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर प्रतिवर्षी ग्रंथमहोत्सवाचे भव्य आयोजन करते. सलग तेराव्या वर्षी आंम्ही हा उपक्रम राबवत आहोत.

या वर्षीचा ग्रंथमहोत्सव हा दिनांक **२१–०२–२०१९** ते **२२–०२–२०१९ या** दरम्यान घेण्याचे नियोजन केलेले आहे. दि.**२२–०२–२०१९ रोजी शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दिक्षांत समारंभ मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव, मा. कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहूणे म्हणून मा.डॉ. श्री. एस. सी. शर्मा, संचालक, नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रीडीटेशन कॉन्सील, बेंगलोर हे उपस्थित राहणार आहेत. मा. कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथदिंडी पालखीचे आयोजनही सदर दिवशी होणार आहे**. या ग्रंथमहोत्सवात सर्व महाविद्यालयांचे ग्रंथपाल उपस्थित राहणार आहेत. तेंव्हा हा 'ग्रंथमहोत्सव २०१९' भव्य स्वरूपात आयोजित होईल यात शंकाच नाही.

याच बरोबर प्रकाशकांचा/पुस्तकविक्रेत्यांचा खप वाढणेकामी विद्यापीठ ग्रंथालयाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २४० संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षकांना / ग्रंथपालांना 'शिक्षकांची वैयक्तीक ग्रंथालय योजना (TPLS) अंतर्गत व त्यांच्या ग्रंथालयासाठी पुस्तक खरेदी बाबत एका विशेष परिपत्रकाने अगोदरच कळविण्यात आलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मी आपणा सर्वास '**ग्रंथमहोत्सव २०१९**' मध्ये आपला स्टॉल आरक्षित करण्याची आग्रहाची विनंती करीत आहे. या संदर्भात आपल्याला अधिकची माहिती पाहिजे असल्यास ई–मेलद्वारे nbk.ul@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.in तसेच दूरध्वनी क्र. – ०२३१/२६०९२०४, फॅक्स ०२३१/२६९१५३३ द्वारे मिळेल.

अधिकच्या माहितीसाठी कृपया ग्रंथालयातील खालील कर्मचा–यांशी संर्पक साधावा.

१) डॉ.डी.बी.सुतार, उपग्रंथपाल, बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय) — फोन नं. ०२३१/२६०९२१०
२) श्रीमती एस. एस. पाटील, वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय) — फोन नं. ०२३१/२६०९४२१
३) श्री अ.अ.देवकर, वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय) — फोन नं. ०२३१/२६०९२०८

सोबत स्टॉल आरक्षित करण्याबाबतचे नियम व अटी यांची यादी जोडलेली आहे.

कळावे,

आपली स्नेहांकित,
NKhot 6/2/19
**डॉ. नमिता खोत**
**समन्वयक ग्रंथमहोत्सव २०१९**

नियम व अटी:—

१) **जागाभाडे रक्कम रू २०००/—फक्त दोन दिवसासाठी राहील.** सदर रक्कमेचा डि. डि अथवा नगद रक्कम **" मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर "** यांचे नावे काढुन अथवा ऑनलाईन सेवेमार्फत https://paysuk.unishivaji.ac.in/bwayspayonline/ या मथळयाखाली आपला स्वत:चा लॉगीन नेम व पासवर्ड तयार करून भरावा किंवा प्रत्यक्षपणे रोख रक्कम दिनांक **२०-०२-२०१९** पर्यंत E-4-R-19 या अंदाजपत्रकीय शीर्षकाखाली विद्यापीठात भरावी. online पैसे भरल्यानंतर तसा e-mail कार्यालयाच्या माहितीसाठी nbk.ul@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.inया ॲड्रेसवर अथवा खाली दिलेल्या फोन नंबरवर करावा. विहीत मुदतीपर्यत पैसे न भरल्यास स्टॉलचा ताबा देण्यात येणार नाही.

२) स्टॉलची संख्या मर्यादित (२५) असुन 'प्रथम येणा—यास प्रथम संधी' या तत्वानुसार दि. **२०-०२-२०१९** पर्यत आलेले डि. डि./ रोख रक्कम यांनाच स्टॉल लावणेसाठी आमंत्रित करण्यात योईल.

३) एकदा जागाभाडे म्हणुन भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाहीत.

४) **जागाभाडे अतंर्गत प्रत्येक स्टॉलला ३ टेबल व ३ खुर्च्यांचा पुरवठा करण्यात येणार असून, अधिकचे फर्निचर साहित्य, टेबल्स, खुर्च्या, इलेक्ट्रॉनिक्स, लाईटस्, फॅन, टेबल क्लॉथ इ. हवे असल्यास तसे आगाऊ कळविल्यास नियमाप्रमाणे त्याचे अधिकचे पैसे भरून अधिकचे साहित्य घेता येईल.**

५) पुस्तक विक्रेते/ स्टॉलधारक स्वत:चे रॅक , कपाट व फर्निचर साहित्या मांडणीसाठी आणू शकतात.

६) दिलेल्या प्रत्येक स्टॉलची जबाबदारी ज्या त्या स्टॉल धारकाने घ्यावी. स्टॉलमधील कोणतेही साहित्य विद्यापीठाच्या अधिविभागात /इमारतीत /खोल्यांमध्ये ठेवता येणार नाही.

७) विद्यापीठामार्फत विद्यापीठ सुरक्षा स्टॉलभोवती पुरवण्यात योईल.

८) ग्रंथमहोत्सव दरम्यान स्टॉलधारकांनी त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यापीठ गेस्टहाउस मध्ये चार्जेस घेऊन अथवा इतरत्र स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच जेवणाची व्यवस्था स्टॉल धारकांच्या आवश्यकतेप्रमाणे पुर्वसुचना दिल्यास योग्य ते चार्जेस घेऊन गेस्टहाउस विभागामार्फत केली जाईल. त्यासाठी त्यांनी तेथे संपर्क साधावा.

९) कोणत्याही नैसर्गिक आपत्तीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१०) **ड्रॉ पध्दतीने स्टॉलचे नंबर काढण्याबाबत सर्व निमंत्रित स्टॉलधारकांची एवकत्रित बैठक दि.२०—०२—२०१९ रोजी दुपारी १ वाजता ग्रंथालयात घेण्यात येईल. एकदा ड्रॉ पध्दतीने देण्यात आलेला स्टॉल क्रमांक नंतर बदलता येणार नाही. सर्व स्टॉल धारकांनी २० तारखेलाच स्टॉलचा ताबा घेऊन मांडणी करणे बंधनकारक राहील.दि. २१/२/२०१९ रोजी सकाळी ८.३० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यापूर्वीच वरीलप्रमाणे दि. २० रोजी रात्री स्टॉल मांडणी करावी.**

११) ग्रंथप्रदर्शन स्टॉल बंद झाल्यानंतर स्टॉलधारकांना रात्री स्टॉलमध्ये थांबता येणार नाही.

१२) पुस्तक विक्रीबाबतच्या काही योजना, कमिशन विशेष सवलत योजना असल्यास विक्रेते विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी थेट संपर्क करू शकतात. महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या पुढील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**http://www.unishivaji.ac.in/bcud/College-List**

१३) ग्रंथमहोत्सव २०१९ संबधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील. आपण आपले बुकस्टॉल त्वरीत नोंदवावेत ही नम्र विनंती.

१४) ग्रंथमहोत्सवाच्या शेवटच्या दिवशी रात्री १०.०० पर्यंत स्टॉल धारकांनी स्टॉलची जागा रिकामी करून देणे बंधनकारक राहील.

*****************************************************************************

For additional information, kindly contact to the following Library staff members-

1) Dr. S. R. Birje, Senior Library Assistant 0231/2693140/2609421
2) Dr. R. D. Khamkar, Senior Library Assistant 0231/2609209
3) Mr. A. B. Matekar, Senior Library Assistant 0231/2609210/2609212

- **Date of Exhibition : 21-02-2019 to 22-02-2019**
- **Venue Spot Rate : Rs.2000/- Per Stall for 2 days**
- **DD/Cash in favor of : Finance and Accounts Officer, Shivaji University, Kolhapur**
- **Online payment URL : https://paysuk.unishivaji.ac.in/bwayspayonline/**
  **(Create your own login name & password for new registration)**
- **Date of Stall Allotment meeting: 20-02-2019 at 1.00 p.m**

**(Note: Cheques are not allowed. Only DD or Cash is allowed)**

*****************************************************************************